## अर्ज निशाणी क्रमांक २२ वर आदेश

(पारीत केलेला दिनांक २८.०३.२०२३)

०१. प्रस्तूत अर्ज वादीने वादपत्रावर दिनांक **१५.१०.२०२२** रोजी **"दावा खारीज करण्यास ठेवण्याचा"** झालेला आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादींनी अनेकदा मुदत घेतली आहे. दावा जुना आहे. वादीला संधी देण्यात आली होती. म्हणून प्रतिवादींनी अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

०३. दोन्ही पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०४. वादीने पुरावा दिला नाही म्हणून **"दावा खारीज करण्यास ठेवण्याचा"** आदेश दिनांक **१५.१०.२०२२** रोजी पारीत झाला आहे. वादीने ते पुरावा देण्यास तयार असल्याचे नमूद करुन सोबत पुराव्याचे शपथपत्र दिले आहे. म्हणून वादपत्रावरील दिनांक **१५.१०.२०२२** रोजीचा आदेश रद्द करणे उचित आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **नि.क्र.२२** मंजूर करण्यात येतो.
२. वादपत्रावर दिनांक **१५.१०.२०२२** रोजी **"दावा खारीज करण्यास ठेवण्याचा"** केल्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.03.28 16:51:32 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– २८.०३.२०२३.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,**
**ठिकाण :– औसा.** **औसा. जिल्हा लातूर.**